मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र. ५.१.१ अन्वये Proposed Road Network Plan तपासणीकामी सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना व करावयाची कार्यवाही.

**महाराष्ट्र शासन**
**नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**नगर रचना संचालनालय**
**मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.**

## आदेश

जा.क्र.रेखाकला/कार्यासन-०२/Road Network/६००    दि. ०४.०२.२०२२

**विषय :-** मनपा / नप / नपं हद्दीलगतच्या क्षेत्रातील एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र. ५.१.१ नुसार तयार केलेल्या Proposed Road Network Plan तपासणी करतांना रेखाकला विभागाने विचारात घ्यावयाच्या सूचनाबाबत...

**वाचा ;-** १)नगर विकास विभागाकडील शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/ १८/कलम ३७ (१कक)(ग) व कलम २०(४)/ नवि-१३, दि.०२/१२/२०२०.

२)नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२१/५७५/प्र.क्र.१२१/ २१(भाग-१)/नवि-१३, दि.०२/१२/२०२१.

३) संचालनालयाकडील आदेश क्र. रेखाकला/ कार्यासन-०२/Road Network/३५१, दि.१९.०१.२०२२.

ज्याअर्थी, शासनाने अधिसूचना क्र, टिपीएस-१८१८ /प्र.क्र.२३६ /१८ / कलम३७ (१कक)(ग) व कलम २०(४) /नवि-१३, दि.०२.१२.२०२० अन्वये राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे (काही अपवाद वगळता) आणि प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केली असून ती दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त नियमावलीतील काही तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणी मध्ये येणाऱ्या अडचणींबाबत सुधारणा करणेसंदर्भात विनियम क्र. १.१० अन्वये मंजूर नियमावलीस दि.०२/१२/२०२१ रोजी शुद्धिपत्रक/पुरकपत्र निर्गमित केले आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने दि.०२/१२/२०२१ रोजीच्या शुद्धिपत्रकान्वये उक्त विनियम क्र.५.१.१. नुसार-

**5.1 FOR ALL REGIONAL PLAN AREAS**

No.5.1.1 Development Permissible adjacent to Gaothan For the villages………………………..in residential zone may be permitted:-

i)Within a belt of 2.00 km from the boundaries of Municipal Corporation, 1.00 km from the boundaries of Municipal Council and 0.50 km from the boundaries of Nagar Panchayat, where zone plans are **prepared or** not prepared in the Regional Plan for such area;

**However the proposed development within such belt shall be guided by the road network of published/sanctioned zone plans or elsewhere proper road network plan prepared and approved by the Director of Town Planning within 6 months or within such time limit as extended by Government.** असे नमुद केले आहे.

ज्याअर्थी, उक्त नमूद मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली विनियम क्र. ५.१.१ अन्वये Road Network नकाशे तयार करणेकरिता करावयाची कार्यवाही व सर्वसाधारण सूचना संदर्भ वाचा ३ अन्वये निर्गमित केल्या आहेत.

त्याअर्थी, आता Proposed Road Network Plan नकाशे तपासणीकामी सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना सोबतच्या प्रपत्रानुसार पुढील कार्यवाहीसाठी निर्गमित करण्यात येत आहेत.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**नगर रचना संचालनालयाचे आदेश जा.क्र.रेखाकला/कार्यासन-०२/Road Network/६३१ दि. ०४. ०२. २०२२**
**सोबतचे प्रपत्र**

**Proposed Road Network Plan तपासणेकामी विचारात घ्यावयाच्या सर्वसाधारण सूचना.**

१) Road Network Plan तयार करावयाच्या गाव नकाशांची जुळणी व्यवस्थितरित्या केली आहे काय?

२) मनपा / नप / नपं मंजूर वि.यो. नकाशाच्या हद्दी (मूळ + वाढीव हद्द) इ. योग्यरित्या दर्शविलेल्या आहेत काय?

३) मनपा / नप / नपं वि.यो. यांच्या हद्दीपासून एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र. ५.१.१ नुसार विहित अंतर योग्यरित्या दर्शविले आहे काय?

४) मनपा / नप/ नपं हद्दीतील व परीघस्त हद्दीतील अस्तित्वातील सर्व रस्त्यांचे (ग्रामीण रस्त्यांसह पाणंद रस्ते, साखळी रस्ते, शिव रस्ते व इतर विद्यमान रस्ते) स्थान योग्यरित्या दर्शविले आहे काय व त्याचे समन्वयन योग्यरित्या झाले आहे काय?

५) मनपा / नप/ नपं व परीघस्त हद्दीतील अस्तित्वातील रस्त्यांचे समन्वयन व रेल्वे लाईन यांचे समन्वयन योग्यरित्या झाले आहे काय?

६) वर्गीकृत रस्ते- योग्य रुंदीसह व रस्त्यांच्या दर्जासह दर्शविलेले आहेत काय ?

७) अस्तित्वातील नैसर्गिक / कृत्रिम जलप्रवाह (नदी, नाले, तळी, तलाव, कालवे इ.) चा सविस्तर तपशिल नकाशावर योग्यरित्या दर्शविला आहे काय?

८) परिघस्त क्षेत्रातील मंजूर रेखांकनातील व विकास परवानगी प्रकरणांमधील मंजूर / शिफारस नकाशे मधील अस्तित्वातील / नियोजित सर्व रस्त्यांच्या जाळ्यांसह रस्त्याची आखणी योग्यरित्या दर्शविले आहे काय? शाखा कार्यालयाच्या स्तरावर यानुषंगाने सविस्तरपणे खात्री करणे आवश्यक आहे.

९) परिघस्त क्षेत्रात समाविष्ट गावातील विहित अंतरातील झालेल्या अनधिकृत विकासामधील अस्तित्वातील रस्त्यांचे जाळे दर्शविले आहे काय? शाखा कार्यालयाच्या स्तरावर यानुषंगाने सविस्तरपणे खात्री करणे आवश्यक आहे.

१०) अस्तित्वातील Road Network चे प्रस्ताव विचारात घेऊन Proposed Road Network चे नियोजन केले आहे काय?

११) मंजूर रेखांकनातील व विकास परवानगी प्रकरणांमधील मंजुर/शिफारस नकशांमधील सर्व रस्ते विचारात घेऊन Proposed Road Network प्रस्तावित केले आहे काय?

१२) अधिकृत/अनधिकृत विकास विचारात घेवून, रस्त्यांचे जाळे नियोजित करताना शक्यतो सर्व्हे नंबरच्या हद्दीपासून दोन्ही बाजूस समसमान रुंदीने रस्त्यांची आखणी प्रस्तावित केली आहे काय?

१३) सर्वसाधारणपणे विकासाचा कल विचारात घेऊन ५०० मी. ते ३०० मी. × ५०० मी. ते ३०० मी. अशी Grid विचारात घेऊन रस्त्याचे जाळे तयार करणेत आले आहे काय?

१४) Road Pattern /Road Hierarchy योग्य रित्या दर्शविली आहे काय?

१५) नैसर्गिक/ कृत्रिम जलप्रवाह (नदी, नाले, विहीर, कालवा (Canal), तलाव, इ.) च्या बहुतांशी विद्यमान आखणीत समांतर Proposed Road Network मूळे बाधित होणार नाही, या दृष्टीने रस्त्यांचे जाळे नियोजित केले आहे काय?

१६) नकाशामध्ये विभागीय स्तरावर छाननीअंती रस्ता रद्द / रूंद किंवा नव्याने प्रस्तावित करावयाचा आहे काय ?

१७) मूळ मंजूर नकाशामधून हद्दीबाहेर जाणा-या सर्व प्रकारच्या रस्त्यांची रुंदी Proposed Road Network Plan मध्ये कायम ठेवण्यात आली आहे काय ?

१८) मंजूर प्रादेशिक योजनेतील प्रादेशिक योजना रस्ते व सदरचे Proposed Road Network यामधील रस्त्यांच्या समन्वयतेबाबत पडताळणी केली आहे काय ?

१९) Proposed Road Netwा rk करीता योग्य रंगसूची (Red colour) दर्शविली आहे काय?

२०) नकाशावर सहायक संचालक, नगर रचना व सहसंचालक, नगर रचना विभाग यांची प्रमाणपत्रे आहेत काय ?

२१) नकाशावरील स्केल १: ८००० व १: १०,००० आहे काय?

२२) Index (Legend) नुसार नकाशावर रंगसूची दर्शविली आहे काय?

२३) मुख्य कार्यालयाकडील जा. क्र. ३५१, दि.१९.०१.२०२२ चे आदेशानुसार Proposed Road Network नकाशे आहेत काय?

२४) वस्तुस्थितीनुरुप इतर अन्य बाबींसंदर्भाने तपासणी करण्यात आलेली आहे काय ? असल्यास त्यानुषंगानेचा संक्षिप्त तपशिल.

*******